.. Bhagavata Arati ..

# ॥ भागवताची आरती ॥

जयदेव जयदेव श्रीमद्भागवता ।
श्रवणें मननें पठणें भक्ती ये हाता ॥ धृ ॥

वेदाचें हें सार पाहे रसभरित ।
दशलक्षण हें आहे लक्षीत ॥ जय ॥ १॥

द्वादश स्कंधामध्यें हरीची लीळा ।
तिनशें पस्तिस अध्ये गाती गोपाळा ॥ जय ॥ २॥

अठरा सहस्र श्लोक गाती ऐकती ।
ज्यासी हरीभक्ती त्यासी तत्प्राप्ती ॥ जय ॥ ३॥

गायत्रीचें मंत्ररूप हें पाहें ।
परीक्षिति- शुकसंवाद आहे ॥ जय ॥ ४॥

भागवतरूपी देवा तूंचि अहेसी ।
करूं ही आरति एका- जनार्दनासी ॥ जय ॥ ५॥

इति

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 27, 1999